**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**दि.०७/०५/२०२६**

***वसई विरार शहर महानगरपालिका मा.आरोग्य समिती व मा.महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व उप-सभापती पदासाठी समिती सदस्यांचे नामनिर्देशनपत्र सादर ;***
***दि.०८ मे रोजी विशेष बैठकीद्वारे होणार निवड***

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मा.आरोग्य समिती तसेच मा.महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व उप-सभापती पदासाठीची निवड करण्यासाठीची विशेष बैठक शुक्रवार दि.०८ मे २०२६ रोजी, दुपारी १२.०० वाजता वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, सर्वसाधारण सभागृह, ४ था मजला, यशवंत नगर, विरार (प.) येथे मा.पीठासीन अधिकारी श्री.मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली असून या पदांसाठी सदरील समितींच्या इच्छुक सदस्यांनी आपले नामनिर्देशनपत्र मा.नगरसचिव, वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडे सादर केले आहे.
नामनिर्देशनपत्र सादर केलेल्या समिती सदस्यांमध्ये मा.आरोग्य समिती सभापती पदासाठी डॉ.योगिता गवळी-करंजकर व श्री.निलेश दामोदर देशमुख तसेच मा.आरोग्य समिती उप-सभापती पदासाठी श्री.जितेश हरीश्चंद्र राऊत व श्री.निशाद अरुणा अरुण चोरघे या समिती सदस्यांनी आपले नामनिर्देशनपत्र सादर केले आहे.
त्याचप्रमाणे मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदासाठी श्रीमती सान्वी संजोग यंदे व श्रीमती बिना मायकल फुट्यार्डो तसेच मा.महिला व बालकल्याण समिती उप-सभापती पदासाठी श्रीमती मीरा समिर निकम व श्रीमती सुवर्णा अजित पाटील यांनी आपले नामनिर्देशनपत्र सादर केले आहे.